कर्जत नगरपरिषद,कर्जत

ता.कर्जत, जि.रायगड

वाचले :
1) श्री. दिपक लक्ष्मण करोडे वै. 2 तर्फे विकासक मे. सार्थक इंफ्रा तर्फे भागीदार प्रकाश डाह्याभाई मकानी रा. 401, महाप्रग्या हाईट्स, प्लॉट नं. 49, सेक्टर 20, खारघर, नवी मुंबई - 410210 यांचा दि. 17/03/2015 चा अर्ज.
2) मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांसकडील बिनशेती आज्ञापत्र क्र.एल.एन.ए. 1(ब)/ प्र.क्र. 165/2013 दि. 01/10/2014.
3) प्रोजेक्ट वास्तुविशारद श्री. धर्मेश व्ही. भलानी यांचे दिनांक 20/06/2015 चे कार्पेट एरीया स्टेटमेंट सर्टिफिकेट व बांधकाम खर्चाचे प्रमाणपत्र.
4) स्ट्रक्चरल इंजीनिअर श्री. सुरेंद्र व्ही. पटेल यांचे दिनांक 20/06/2015 चे पत्र.

जावक क्रमांक; 147/ /15-16
क्र.इमारत/ कात-1/एस आर. 18 /15-16
कर्जत नगरपरिषद कार्यालय,कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड
दिनांक 23/ 6 /2015

जोता लेवल पर्यंत बांधकाम परवानगी प्रारंभ प्रमाणपत्र

ज्या अर्थी, श्री. दिपक लक्ष्मण करोडे वै. 2 तर्फे विकासक मे. सार्थक इंफ्रा तर्फे भागीदार प्रकाश डाह्याभाई मकाणी यांनी मौजे मुद्रे बुद्रुक येथिल स.नं. 11 भु.क्र. 1 एकूण क्षेत्र. 8300.00 चौ.मी. पैकी 3300.00 चौ.मी. इतके क्षेत्र 12.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याने व 596.00 चौ.मी. इतके क्षेत्र अतीक्रमणाने व 1016.00 चौ.मी. इतके खुली जागाने बाधीत असून उर्वरीत जागेवर रहिवास व वाणिज्य प्रयोजनार्थ करावयाच्या बांधकाम नकाशास मंजूरी मिळणे बाबत इकडे विनंती अर्ज केलेला आहे. अर्जदाराच्या विषयांकीत जागेस मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांसकडील बिनशेती आज्ञापत्र क्र.एल.एन.ए. 1(ब)/ प्र.क्र. 165/2013 दि. 01/10/2014 अन्वये बिनशेती आज्ञापत्र प्राप्त आहे. अर्जदाराची विषयांकीत जागा ही मंजूर विकास योजना, कर्जत (सु. + वा. क्षेत्र) (2001 ते 2021) नुसार रहिवास विभागात अंतर्भूत आहे.

ज्या अर्थी, सादर केलेला नकाशा व संबंधीत कागदपत्रे यांची कनिष्ठ अभियंता यांचे मार्फत तांत्रिक छाननी केली असता ती छाननी तक्त्यानुसार बरोबर आढळुन आली असून त्या अन्वये सदर नकाशात हिरव्या रंगाने दुरुस्ती करुन नकाशास मंजूरी देणेत आली आहे.

त्या अर्थी, वरील परिस्थीती अवलोकन करता महाराष्ट्र राज्य मधिल नगरपालिका व नगर पंचायतीसाठी प्रमाणीत विकास नियंत्रण व प्रोत्साहण नियमावली मधील कलम 6.6 नुसार व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगीक नगरी अधिनियम 1965 चे कलम 189 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, मुख्याधिकारी, कर्जत नगरपरिषद, वरील बांधकामास/नकाशास खालील अटी व शर्तींवर मंजूरी देत आहे.

अटी व शर्ती :

1) वरील जागेचा व नियोजीत इमारतीचा वापर फक्त रहिवास व वाणिज्य वापर या कारणासाठी करणेत यावा. व बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असावे.
2) **अर्जात नमूद केलेप्रमाणे परवाना धारक आर्किटेक्ट/इंजिनिअर/सुपरवायजर श्री. धर्मेश व्ही. भलानी , व स्ट्रक्चरल इंजिनिअर श्री. सुरेंद्र व्ही. पटेल यांचे देखरेखेखाली काम करणेचे आहे. व आर्किटेक्ट/इंजिनिअर/सुपरवायजर श्री. धर्मेश व्ही. भलानी यांनी बांधकामाची व अर्जदार श्री. दिपक लक्ष्मण करोडे वै. 2 तर्फे विकासक मे. सार्थक इंफ्रा तर्फे भागीदार प्रकाश डाह्याभाई मकाणी यांनी स्ट्रक्चरल इंजिनिअर श्री. सुरेंद्र व्ही. पटेल यांचेकडेल आर.सी.सी. डिझाईन प्राप्त करुन डिझाईननुसार काम करुन घेणेची जबाबदारी त्यांचेवर बंधनकारक राहील व आर.सी.सी कामाचे स्ट्रक्चर तपासणी अहवाल अर्जदारांनी मासीक प्रगती अहवालासोबत देणे बंधनकारक राहील. यामध्ये कोणतीही कसूर राहिल्यास व कोणताही धोका निर्माण झाल्यास सदरची पूर्णत: जबाबदारी अर्जदार यांची राहील व त्यांचेवतीने आर्किटेक्ट/इंजिनिअर/सुपरवायजर श्री. धर्मेश व्ही. भलानी , व स्ट्रक्चरल इंजिनिअर श्री. सुरेंद्र व्ही. पटेल यांची पूर्ण जबाबदारी राहील. याबाबत कोणत्याही जबाबदारीस नगरपरिषद जबाबदार राहणार नाही.**
3) स्थळदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजीत बांधकामापासून पुढील, मागील व बाजूस अंतरे प्रत्यक्षात जागेवर किमान असली पाहिजेत व त्या खालील जागा कायम खुली ठेवली पाहिजे व त्याची खात्री नगरपरिषदेस करुन देणे अर्जदारांवर / विकासकांवर बंधनकारक राहील.
4) बांधकामास सुरवात करणेपुर्वी या कार्यालयाकडे लेखी स्वरुपात त्या बाबतची माहिती देणे अर्जदार/विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

5) इमारतीचे बांधकाम जोत्याचे पातळी (प्लिंथ लेव्हल) पर्यंत आलेवर प्लिंथ चेकींगसाठी अर्ज करुन रितसर प्लिंथ चेकींगचा दाखला व पुढील कामची परवानगी घेऊन, पुढील बांधकाम करावे अन्यथा सदरचे बांधकाम बंद करणेत येईल.

6) बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे व तुमचे हद्दीच्या आत केले पाहिजे व ते पूर्ण झाल्यावर इमारत वापरास सुरुवात करणेपूर्वी किमान तीन दिवस मुदतीत परवानाधारक आर्किटेक्ट/इंजिनिअर/सुपरवायझर श्री. धर्मेश व्ही. भलानी यांनी बांधकाम कंप्लीशन सर्टिफिकेट व स्ट्रक्चरल इंजिनिअर श्री. सुरेंद्र व्ही. पटेल यांचे भुकंप रोधक स्टबीलीटी सर्टीफिकेट सादर करुन नगरपरिषदेकडून ऑक्युपन्सी सर्टिफिकेट (वापर परवाना) घेणे आवश्यक आहे. त्याशीवाय इमारतीचा वापर करता येणार नाही. तसे निदर्शनास आलेस महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम 1965 चे कलम 193-3ब प्रमाणे कारवाई करणेत येईल.

7) प्रकाश व वायुवीजन यासाठी ठेवलेल्या खिडक्यांचे क्षेत्र हे मंजूर नकाशाप्रमाणे असावे.

8) सदरहु बांधकामामुळे नगरपरिषदेच्या विकास आराखडयात (डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये) किंवा अन्य कोणत्याही सार्वजनिक कामात अडथळा निर्माण झाल्यास केलेले बांधकाम तुमचे खर्चाने काढून घ्यावे लागेल व त्याबद्दल तुम्हांस कोणतीही नुकसान भरपाई मिळणार नाही.

9) नियोजीत बांधकामास मंजूरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे असल्यास किंवा वापर बदलावयाचा असल्यास त्यासाठी पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

10) नियोजीत बांधकाम हे मंजूर नकाशाप्रमाणे स्टिल्ट मजला + तळमजला व त्यावर चार मजले यापेक्षा जास्त असू नये व प्रत्येक मजल्यावरील कमाल बांधकाम हे नकाशात दर्शविल्यानुसार खालील प्रमाणे असणे आवश्यक आहे.

मजल्यांची सख्या	प्रस्तावित मंजूर कमाल बांधकाम क्षेत्र (चौमी)	वापर	एकूण विंग
स्टिल्ट मजला	838.199	फक्त वाहनतळासाठी (चटई क्षेत्रमुक्त) Not for Sale	विंग 8 दुकानगाळे 22 निवासी सदनिका 152
तळमजला	413.414	वाणिज्य	
पहिला मजला	1251.613	रहिवास	
दुसरा मजला	1251.613	रहिवास	
तीसरा मजला	1251.613	रहिवास	
चौथा मजला	1251.613	रहिवास	
एकूण	**5419.866 चौ.मी.**		

11) नियोजित इमारतीसाठी आवश्यक असणा-या पाण्याची सोय तसेच सांडपाण्याची व मैला निमुर्लनासाठी व्यवस्था नसल्यास प्रत्यक्ष वापरापुर्वी अर्जदार यांनी केली पाहीजे.

12) विषयाधीन भुखंडाचे स्थान, वहिवाट, भोगवटादार, भाडेकरु, हद्दी, क्षेत्रफळ, वापर व कोणत्याही प्रकारचा मालकी हक्का संबंधी व इतर कायदेशीर वाद निर्माण झाल्यास त्या संबंधीचे सर्व जबाबदारी अर्जदार, जमीनमालक यांचेवर राहील.

13) महाराष्ट्र राज्य मधिल नगरपालिका व नगर पंचायतीसाठी प्रमाणीत विकास नियंत्रण व प्रोत्साहण नियमावली मधील कलम 6.7 नुसार ही बांधकाम परवानगी देणेत आलेल्या तारखेपासून 1 वर्ष (दिनांक 28/6 /2016 पर्यंत) चालू (वैध) राहील. त्यानंतर पुढील वर्षासाठी अर्जदारांनी योग्य त्या कारणांसहीत नगरपरिषदेकडे विनंती अर्ज करुन सादर परवानगीचे नुतनीकरण मुदत संपण्यापुर्वी करणे आवश्यक राहील. अशा प्रकारचे नुतनीकरण फक्त तीन वर्षे करता येईल. वैध मुदतीत बांधकाम पुर्ण केलेले नसेल तर नवीन परवानगी घ्यावी लागेल. नवीन परवानगी घेतांना त्यावेळी अस्तीत्वात असलेल्या नियमांचा व नियोजित विकास आराखडयाच्या अनुषंगाने छाननी करण्यात येईल व ती बाब अर्जदार / जमिन मालक यांचेवर बंधनकारक राहील.

14) सोबत मंजूर केलेल्या (हिरव्या रंगाने दर्शविलेल्या दुरुस्ती प्रमाने) नकाशाप्रमाने बांधकाम करणेचे आहे.

15) विषयाधीन जागेवरील इमारतीचे बांधकाम करतांना आय.एस 13920-1993 मधील भुकंप प्रतिकारक आर.सी.सी डिझाईन नुसार बांधकाम घटकांचे नियोजन करणे तसेच इमारतीचे स्ट्रक्चरल योग्य त्या अहर्ताप्राप्त नोंदणीकृत स्थापत्य अभियंता यांचेकडुन करुन घेणे आवश्यक असून त्यांचे देखरेखीखाली नियोजीत इमारतीचे बांधकाम पुर्ण करणे अर्जदार / विकासकर्ता यांचवर बंधनकारक राहील.

16) सदर भुखंडावरील इतर अस्तीत्वातील बांधकामे असल्यास ती काढुन टाकणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

17)सदर जागेसंबधी काही पुर्व संदर्भ /न्यायालयीन संदर्भ असल्यास त्याबाबतची जबाबदारी सर्वस्वी अर्जदार/ जागा मालक यांचेवर राहील.

18)बांधकामामध्ये फ्लाय अँश विटा व फ्लाय अँश आधारीत साहीत्याचा वापर करावा.

19)विषयाधीन जागे लगतच्या भुखंडधारकांच्या हद्दी बाबत काही तक्रारी असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार/विकासकांवर राहील.

20)जागेतुन किंवा जागे जवळून अतिदाब विद्युत वाहीनी जात असल्यास बांधकाम करण्यापुर्वी संबंधीत खात्याकडून ना हरकत दाखला घेतला पाहेजे. (नियोजीत भुखंडातून अति उच्च दाबाची विद्युत वाहीनी जात असल्यास त्याचा ना हरकत दाखला प्राप्त करुन घेणेत यावा. तद् नंतर तेथील बांधकाम सुरु करणेत यावे.)

21)जागा महामार्ग (सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्याचे मध्यापासून 37.00 मी. अंतराचे आत असल्यास) किंवा रेल्वे मार्गास (रेल्वेच्या हद्दीपासून 30.00 मी. अंतराचे आत असल्यास) सन्मुख लागून किंवा जवळ असल्यास संबंधीत खात्याकडून बांधकाम सुरु करण्यापुर्वी ना हरकत दाखला घेतला पाहिजे. व त्यातील अटीशर्ती अर्जदारावर बंधनकारक राहील.

22)यापूर्वी सदर जागेतील बांधकाम करण्याबाबतचा पूर्वीचा परवाना असेल तर तो याद्वारे रद्द झाला असे समजावे.

23)मंजूर नकाशाबाबत जागेवर प्रारंभ प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक आणि इतर माहिती लावून फलक लावावा.

24)जर भुखंडाचे क्षेत्रफळात व हद्दीमध्ये फरक आढळल्यास सुधारीत परवानगी घेणे बंधनकारक राहील.

25)इमारतीमधील सदनिका धारकांच्या दूचाकी व चारचाकी वाहनांची पार्किंगची सोय करणे भुखंड मालक, विकासकर्ता, वास्तुविशारद व सदनिका धारक यांनी त्याच इमारतीचे आवारात करणेंत यावी. कोणत्याही परिस्थीतीत रस्त्यावर पार्किंग होणार नाही याची काळजी घ्यावी.

26)प्रस्तावीत केलेल्या इमारतीच्या भुखंडास कुपंण घालावयाचे असल्यास ते भुखंडाचे हद्दीत बांधण्यात यावे. रस्त्याची रुंदी कोणत्याही परिस्थीतीत कमी करु नये याची नोंद घ्यावी. व गेटची लांबी कमीत कमी 4.50 मी. इतकी असावी.

27)बांधकाम करीत असताना बांधकामचे कोणतेही साहित्य उदा. वाळू, खडे, विटा, लोखंडी अँगल्स इत्यादी नगरपरिषदेचे सार्वजनीक रस्त्यावर साठा करुन अतिक्रमण करता कामा नये. तसे आढळून आल्यास कायदेशीर कारवाई करणेत येईल. त्याचप्रमाणे कामासाठी ग्रीटचा वापर केल्याचे दिसून आल्यास आपली परवानगी तात्काळ रद्द करणेत येईल. त्याचप्रमाणे आपल्या आर.सी.सी. कामाची वेळोवेळी तपासणी अहवाल शासकीय दक्षता व गुणनियंत्रण प्रयोगशाळा यांच्याकडुन तपासणी करणे बंधनकारक राहील व सदरचा अहवालाशिवाय कामाचे कंप्लिशन दाखले आर्किटेक्ट/इंजिनिअर/सुपरवायजर श्री. धर्मेश व्ही. भलानी व स्ट्रक्चरल इंजिनिअर श्री. सुरेंद्र व्ही. पटेल यांनी सादर करु नये. सदर अटीचा भंग केल्याचे दिसून आल्यास देणेत आलेले लायसन्स रद्द करणेची कार्यवाही हाती घेणेत येईल.

28)बांधकामाचे साहित्य जर नगरपरिषदेच्या रस्त्यावर /गटारावर अगर जागेत रहदारीस अडथळा न येता ठेवावयाचे झाल्यास त्यासाठी दर चौरस फुटांस दररोज रुपया एक प्रमाणे जागा भाडे आकारले जाईल. बांधकाम सुरु करण्यापुर्वी नगरपालिकेची जागा वापरणार अगर कसे या बद्दल लेखी अर्ज देवून व त्यासोबत होणारे हाशिल भरुन मगच बांधकाम सुरु करावे.

29)नियोजीत इमारतीसाठी असलेल्या सेप्टीक टॅक ही मंजूर नकाशानुसार करणेत यावी त्यामुळे आजुबाजुचे घरमालक, रहिवासी, भोगवटादार, कब्जेदार यांना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही अशा ठिकाणी ती असावी.

30)नगरपरिषद हद्दीमध्ये थेट ड्रेनेज व्यवस्था नाही, त्यामुळे इमारतीचे सांडपाणी तुम्ही तुमचे जागेत मंजूर नकाशानुसार शोषखड्डा खोदून मुरविणेचे आहे. अगर सांडपाण्याबद्दल नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडून माहिती घेऊन त्या प्रमाणे व्यवस्था करणेची आहे.

31)इमारतीत जाणे-येण्याकरीता नगरपरिषदेच्या गटारावर ढापा टाकावयाचा असल्यास त्या कामी रीतसर परवानगी घेवून / नगरपरिषदेचे सुचनेप्रमाणे तुमचे स्व:खर्चाने व्यवस्था करणेंत यावी.

32)इमारतीच्या आवारात गेटजवळ ओला कचरा व सुका कचरा यांचे वेगवेगळे ठेवायचे मोठे डब्बे लोखंडी जाळी बसवून बंदीस्त ठेवता येतील अशी सोय भोगवटा प्रमाणपत्र मिळणेपुर्वी करणेंत यावी.

33)शासन निर्णयानुसार पावसाचे पाणी जमिनीत मुरविणेसाठी किंवा साठून ठेवणेसाठी (Rain Water Harwasting/In filteration tank) सदरचे भुखंडात उपाययोजना करावी.

34)महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) अधिनियम 1975 अन्वये वृक्ष संवर्धन आणि जतन अन्वये प्रत्येक 100 चौ.मी. मागे (प्रमाणे) एक या प्रमाणे झाडे /फळझाडे लावून त्याची जोपासना करणे आवश्यक राहील. दाट वस्ती

क्षेत्रातील भुखंडात शक्य असल्यास झाडे लावून त्याची जोपासना करावी. तसेच सध्या अस्तीत्वातील असलेली झाडे तोडण्यापुर्वी नगरपरिषदेच्या उद्यान विभागाकडून स्वतंत्र परवानगी घेणे बंधनकारक आहे.

35) इमारतीसाठी बसविली जाणारी लिफ्ट ही (light back-up सह) ISI मार्क असलेली दर्जेदार व नामांकीत कंपनीची असावी तसेच तीची भविष्यात वेळोवेळी सुरक्षिततेच्या दृष्टीने तपासणी करणेंत यावी.

36) आपले इमारतीमध्ये सौरौर्जावर पाणी गरम करणेचे सौर उष्ण जल संयंत्र बसवावे जेणेकरुन नैसर्गीक स्त्रोताचा वापर होवून गॅस व विजेची खूप कमी प्रमाणावर वापर होवून त्यांची बचत होणेस मदत होईल.

37) नगरपरिषदेचे पाणी स्टोअरेजसाठी जमिनीखालील बंदीस्त R.C.C पाण्याची टाकी मंजूर प्लॅन नुसार बांधणे बंधनकारक आहे.

38) प्रोजेक्ट वास्तुविशारद श्री. धर्मेश व्ही. भलानी यांनी प्रकरणासोबत सादर केलेला कार्पेट एरीया स्टेटमेंट / बिल्टअप एरिया स्टेटमेंट हे मंजूर प्लॅन प्रमाणे असल्याचे तपासून सुधारीत स्टेटमेंट विकासकास/भुखंडमालकास देणे बंधनकारक असून त्या चटई क्षेत्राप्रमाणे सर्व सदनिकांची नोंदणी करणेंत यावी. सदनिकांच्या चटई क्षेत्राबाबत वास्तुविशारद यांची सर्वस्वी जबाबदारी राहील.

39) स्थायी निर्देश क्र.33 नुसार न.प.कडे हस्तांतरीत केलेल्या भुखंडास पोहोच रस्त्याचे W.B.M. पर्यंत खडीकरण व दोन्ही बाजूचे गटार बांधकाम तसेच स्ट्रीट लाईटची सोय विकासकाने करुन देणेचे बंधनकारक राहील.

40) नविन बांधकामच्या ठिकाणी असलेल्या पाणी साठ्यामध्ये डासांची उत्पत्ती होऊ नये म्हणून ठेकेदार / विकासक / घरमालक यांनी सर्व पाणी साठ्यांवर त्यांच्या व्यक्तीगत कामगारामार्फत फवारणी यंत्राद्वारे डास अळीनाशक (ऍबेट) किटकनाशकाची प्रत्येक माळ्यावरील पाणीसाठ्यावर आठवडी फवारणी करावी व त्या ठिकाणी डास उत्पत्ती होणार नाही याची काळजी घ्यावी. सदर नविन बांधकामाचे सिडको/ग्रामपंचायत/नगरपालिका/आरोग्य विभाग यांचेद्वारे नियमीत तपासणी करण्यात येईल व त्या नवीन बांधकामात असलेल्या पाणीसाठ्यात डास अळ्या आढळल्यास त्या ठेकेदारास/विकासकास/घरमालकावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल प्रसंगी बांधकामाची परवानगी रद्द करण्यात येईल. तसेच सदर ठेकेदार यांचेकडे कार्यरत असलेले एकूण सर्व कामगार यांची माहिती त्यांनी स्थानीक आरोग्य विभागास द्यावी व सर्व कामगारांना मलेरिया प्रतिबंधात्मक औषधे खाऊ घालणेकरीता मदत करावी.

41) प्रस्तावासोबत भुखंडमालक / विकासक यांनी या कार्यालयात विविध विकास शुल्क / फि (रक्कम रु. 38,48,612/-) भरणा केलेला असुन 1) कामगार निधी 1% उपकर 75% 2) अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक प्रिमीयम 70% 3) बाल्कणी प्रिमीयम 50% इतकी शिल्लक रक्कमेचा भरणा पुढील वर्षी करावयाचा आहे. तसेच भरणा केलेल्या रकमेत काही फरक निघाल्यास वाढीव रक्कम भरणा करावा लागेल. तसेच इमारत व इमारत बांधकाम कामगार अधिनियम 1966 चे पालन करणे आपणांवर बंधनकारक राहील.

42) मंजूर बांधकाम नकाशाप्रमाणे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर सदर सदनिकांची गृहनिर्माण सोसायटी स्थापण करणे व सदरचे भुखंड हे नियोजीत सोसायटीचे नावे करणेची सर्वस्वी जबाबदारी ही भुखंडमालक / विकासकांची राहिल.

43) वरील अटी व शर्तींचा भंग झाल्यास तसेच प्रकरणासोबत सादर केलेली माहीती, कागदपत्रे दिशाभूल करणारी तथा खोटी असल्यास देणेत आलेली सदरची बांधकाम परवानगी रद्द समजणेत येईल.

मुख्याधिकारी
कर्जत नगरपरिषद,कर्जत

प्रत :

1) श्री. दिपक लक्ष्मण करोडे वै. 2 तर्फे विकासक मे. सार्थक इंफ्रा तर्फे भागीदार प्रकाश डाह्याभाई मकाणी रा. रा. 401, महाप्रग्या हाईट्स, प्लॉट नं. 49, सेक्टर 20, खारघर, नवी मुंबई 410210

2) प्रोजेक्ट पर्यवेक्षक श्री. धर्मेश व्ही. भलानी
(सोबत मंजूर बांधकाम नकाशा एक प्रत जोडली आहे.)

3) प्रोजेक्ट स्ट्रक्चरल इंजिनीअर श्री. सुरेंद्र व्ही. पटेल
(2//- मंजूर बांधकाम नकाशा व परवानगी प्रमाणे भुकंप रोधक R.C.C. डिझाईन बनवून त्याप्रमाने काम करुण घेणे.)